# विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे

## राष्ट्रीय सेवा योजना – वार्षिक अहवाल

2021-22 या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक पुन्हा नवी उमेद घेऊन कार्याला लागले आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून अनेक उपक्रम राबविण्यात रासेयो विभाग यशस्वी झाला.

1. 14.04.2021 डॉ. बाबसाहेब आंबेडकर जयंती महाविद्यालयातील रासेयो विभागाने मर्यादीत विद्यार्थी संख्येत साजरी केली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.
2. 04.06.2021 जागतिक पर्यावरण दिना निमित्त स्वयंसेवकांनी आपापल्या परिसरातील वृक्षांचे संवर्धन व परिसरात वृक्ष लागवड करून पर्यावरण दिन साजरा केला.
3. 06.06.2021 शिवराज्याभिषेक महाविद्यालयातील रासोयो विभागाने मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी प्रा. डॉ. आर. आर. गावीत (इतिहास विभागप्रमुख) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
4. 21.06.2021 जागतिक योगा दिन ऑनलॉईन साजरे करण्यात आले. यात रसेयो स्वयंसेवक, प्राचर्य, प्राध्यपक आणि कर्मचा-यांनी घरी राहून योगासन केली व त्यांचे छायाचित्र रासेयो विभागाला पाठविली.
5. 01.07.2021 वृक्षारोपण कार्यक्रम – दरसालाप्रमाणे या ही वर्षी पावसाळ्याच्या सुरूवातीला वृक्षलागवडीचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयाच्या सोबत स्टेट बँकने ही सहभाग घेऊन वृक्षलागवड केली. स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरात तसेच आपापल्या परिसरातील मोकळ्या जागेत वृक्षलागवड केली. उपक्रमात प्राचार्य, उपप्राचार्य यांनीही सहभाग नोंदविला.
6. 04.09.2021 फिट इंडिया फ्रिडम रन- या उपक्रमांतर्गत स्वयंसेवकांना आरोग्यबाबत जागृत करतांना चांगले धावणे याचे महत्त्व समजावे म्हणून फ्रिडम रनचे आयोजन करण्यात आले.
7. 18.09.2021 वृक्षारोपण व श्रमदान – सदर उपक्रमात स्वयंसेवकांनी वृक्षारोपण सोबत श्रमदान ही केले. श्रमदानातून महाविद्यालयातील मैदान सुस्थितीत करण्याचे कार्य स्वयंसेवकांनी केले.
8. 21.09.2021 योग शिबीर व स्वच्छता मोहिम – सदर उपक्रमात प्रत्यक्ष सहभागातून योग शिबीर घेण्यात आले. यावेळी योगविद्याधाम येथिल प्रशिक्षकांनी शइबीरात मार्गदर्शन केले व प्रत्यक्ष योगासने करून घेतले. यानंतर स्वच्छता मोहिमेतंर्गत महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली.

9. 24.09.2021 राष्ट्रीय सेवा योजना दिन- या वर्षी राष्ट्रीय सेवा योजना दिन महाविद्यालयात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. रासेयो दिनानिमित्त रासेयो सल्लागार डॉ. देवेंद्र विसपुते, डॉ. आर. आर. गावीत यांचे व्याख्यान झाले. यावेळी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. पुष्पा गावीत यांनी केले. प्रस्तावना प्रमुख कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत लगडे यांनी केले. सूत्रसंचालन सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष खत्री तर आभार डॉ. मंजू तरडेजा यांनी केले.
10. 24.09.2021 कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचन कट्टा – राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कबचौउमवि, जळगांव यांच्या परिपत्रकाप्रमाणे दत्तक गाव उडाणे येथिल जि. प. प्राथिमक शाळेत रासेयो विभागाद्वारे कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचन कट्ट्याची स्थापना करण्यात आली. या उपक्रमासाठी डॉ. पुष्पा गावीत, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत लगडे, डॉ. देवेंद्र विसपुते, डॉ. बाजीराव पाटील, प्रा. राजीव आरके, डॉ. योगेश पाटील यांनी आपल्याकडील पुस्तके देऊन उपक्रम यशस्वी केला.
11. 02.10.2021 गांधी जयंती- गांधी जयंती निमित्त रासेयो विभागामार्फत महाविद्यालयाच्या इमारतीची व वर्गांची स्वच्छता करण्यात आली.
12. 15.10.2021 वाचन प्रेरणा दिन – राष्ट्रपती अब्दूल कलाम यांच्या जयंती निमित्त रासेयो विभागाने वाचन प्रेरणा दिन साजरा करतांना स्वयंसेवकांना ग्रथालयात नेऊन ग्रंथ व पुस्तकांविषयी माहिती दिला.
13. 25.10.2021 लसीकरण मोहिम – कोरोना लसीकरण जास्तीत जास्त प्रमाणात व्हावे यासाठी शहरातील युवासेने बरोबर लसीकरण मोहिम महाविद्यालयात राबविण्यात आली. यावेळी एड. पंकज गोरे, प्राचार्य डॉ. पुष्पा गावीत उपस्थित होते. लसीकरण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.
14. 27.10.2021 मिशन युवा स्वास्थ्य – या मोहिमे अंतर्गत अठरा वर्षांवरील युवकांना लसीकरण करण्यासाठी जागृत करणे व प्रत्यक्षात लसीकरण करून घेणे यासाठी महाविद्यालयात रासेयो विभागाने लसीकरण मोहिम राबविली. त्यात मोठ्या प्रमाणात लसीकरण झाले.
15. 31.10.2021 राष्ट्रीय दौड, रन ऑफ युनिटी – सदर उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या मैदानावर रन ऑफ युनिटीचे आयोजन करण्यात आले. ज्यात रासेयो स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला आणि उपक्रम यशस्वी केला.
16. 26.11.2021 संविधान दिन – रासेयो विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि आय.क्यू. ए. सी विभाग यांच्या संयुक्त विद्यमान संविधान दिन निमित्त राज्यस्तरी वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारात प्रताप महाविद्यालयाचे डॉ. संदिप नेरकर प्रमुख वक्ते होते. त्यांनी भारतीय संविधान या विषयावर व्याख्यान दिले. अध्यक्षपदी डॉ. पुष्पा गावीत होत्या. वेबिनारची प्रस्तावना डॉ. योगेश पाटील यांनी केली. तर सूत्रसंचालन रासेयो सहा. कार्यक्रम अधिकारी व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संतोष खत्री यांनी केले.

17. 01.12.2021 जागतिक एड्स दिन – जागतिक एड्स दिनानिमित्त रासेयो विभागाने विविध जनजागृतीपर स्पर्धांचे आयोजन केले. उदा. व्हीडीओ, पोस्टर स्पर्धा इ. यात रासेयो स्वयंसेवकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.
18. 03.12.2021 कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती – बहिणाबाई चौधरी यांच्या जयंती निमित्त प्राचार्य डॉ. पुष्पा गावीत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी रासेयोचे सर्व कार्यक्रम अधिकारी व मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक उपस्थित होते.
19. 06.12.2021 स्वच्छता मोहिम – डॉ. बाबसाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिना निमित्त महाविद्यालयात स्वच्छता मोहिमे आयोजन करण्यात आले होते.
20. 18.12.2021 अल्पसंख्यांक दिन – रासेयो विभागद्वार अल्पसंख्यांक दिनी अल्पसंख्यांक व मानवी हक्क असे दोन्ही दिन एकाच दिवशी साजरे करण्यात आले. या दिवशी उपप्राचार्य खलील अन्सारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
21. 24.12.2021 राष्ट्रीय ग्राहक दिन – रासेयो विभागाद्वारे राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. सर्जेराव गोल्डे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. खलील अन्सारी होते. प्रस्तावना प्रमुख कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत लगडे यांनी केले. सूत्रसंचालन सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष खत्री तर आभार डॉ. मंजू तरडेजा यांनी केले.
22. 28.12.2021 आरोग्य तपासणी शिबीर – शहरातील सुप्रसिध्द डॉक्टर दिलीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर वैद्यकीय महाविद्यालयाच्या वैद्यकीय पथकाने महाविद्यालयाती विद्यर्थ्यांची आरोग्य तपासणी केली.
23. 03.01.2022 सावित्रीबाई फुले जयंती – सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मराठी विभागातील प्रा. राजीव आरके यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य देवेंद्र विसपुते हे होते. प्रस्तावना प्रमुख कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत लगडे यांनी केले. सूत्रसंचालन सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष खत्री तर आभार डॉ. मंजू तरडेजा यांनी केले.

    तसेच सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महाविद्यालयातील परिसर स्वच्छता मोहिम ही राबविण्यात आली. ज्यात रासेयो स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.
24. 06.01.2022 लसीकरण मोहिम – महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लसीकरण व्हावे यासाठी रासेयो विभागाने मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत कोरोना लसीकरणाचे कार्यक्रम आयोजित केले. ज्याचा लाभ महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी घेतला.
25. 11.01.2022 स्वच्छता मोहिम – दि. 11.01.2022 रोजी रासेयो विभागाने स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले. या मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या होस्टेल परिसराची स्वच्छता हाती घेण्यात आली. ज्यात मोठ्या प्रमाणात रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.
26. 25.01.2022 मतदार जागृती दिन – मतदार जागृती दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्राध्यापक दालनात रासेयोच्या स्वयंसेवकांना मतदान करण्यासंबंधीची शपथ देण्यात आली. तसेच लोकशाहीत मतदान

आणि मतांना असेलेल्या महत्त्वा विषय मतदार जागृती कशी करावी या संदर्भात रासेयो प्रमुख कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत लगडे व सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष खत्री यांनी मार्गदर्शन केले.

27. 03.02.2022 श्रमदान उपक्रम – 03.02.2022 रोजी श्रमदान हा उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालयाच्या मदैनातील व परिसरातील अनावश्यक असलेली गवत स्वयंसेवकांनी काढली. तसेच श्रमदान व श्रमसंस्कारांचे जीवनातील महत्त्व स्वयंसेवकांना सांगण्यात आले.
28. 08.02.2022 रोजी 12 जाने. राष्ट्रीय युवादिनानिमित्त जिल्हा रूग्णालय, धुळे यांनी जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत विद्यावर्धिनी महाविद्यालयातील रासेयोचा संघ विजयी झाला.
29. 13.03.2022 प्लॉस्टिक मुक्ती व स्वच्छता अभियान – या अतंर्गत रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालय व परिसरातील प्लॉस्टिक व कॅरीबॅग गोळा करून त्याची योग्य विल्हवाट लावली. तसेच प्लॉस्टिकचे अपाय सांगून जनजागृती केली. त्याच बरोबर स्वच्छता अभियान राबविले.
30. 19.02.2022 शिवजयंती – महाविद्यालयात रासेयो विभागाने 19 फेब्रवारी रोजी मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी केली. यावेळी इतिहास विभागातील प्रा. सतिष निकम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते होते. यावेळी प्रा. सतिष निकम यांनी आपल्या वक्तृत्व शैलीने सर्वांना प्रभावित केले. तसेच विशाल राजपूत, किर्ती मराठे, धर्मेश हिरे, रोहित झोटिंगे, प्रियंका आव्हाड, क्रांती वाघ या रासेयो स्वयंसेवकांनी शिवरायांवर पोवाडाही सादर केला. त्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरात रासेयो स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर केले.
31. 25.02.2022 लसीकरण मोहिम – मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले.
32. 28.02.2022 विशेष शिबीरपूर्व मार्गदर्शन कार्यशाळा – विशेषपूर्व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दि. 28.02.2022 रोजी करण्यात आले. कार्यशाळेत प्रमुख कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत लगडे यांनी शिबीरातील शिस्त, कर्तव्य तसेच संपूर्ण शिबीर काळातील उपक्रम व योजना इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. तर महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मंजू तरडेजा यांनी मुलींसाठी असणारे उपक्रम सांगितले. मजी स्वयंसेवकांनी यावेळी शिबीरातील अनुभव सांगुन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.
33. 02.03.2022 श्रमदान व स्वच्छता मोहिम – 02 मार्च 2022 रोजी महाविद्यालयात श्रमदान व स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. स्वयंसेवकांनी या मोहिमेला चांगला प्रतिसाद देत स्वच्छता मोहिम राबविली.
34. 05.03.2022 ते 11.03.2022 – या कालावधीत विशेष शिबीराचे आयोजन दत्तक गाव उडाणे येथे करण्यात आले. सात दिवसिय शिबीरात स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्व विकासकरीता अनेक उपक्रम घेण्यात आले.

35. 20.03.2022 श्रमदान व वृक्षारोपण - 20 मार्च 2022 रोजी महाविद्यालयात श्रमदान व वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातंर्गत स्वयंसेवकांनी वृक्षांच्या सांगोपनाची जबाबदारी घेत वृक्षांनी पाणी घातले. तसेच परिसरात श्रमदान व स्वच्छता मोहिम राबविली.
36. 23.02.2022 शहिद दिन – रासेयो विभागाने 23 मार्च 2022 रोजी शहिद दिन अनोख्या पध्दतीने साजरा केला. सुरूवातीला भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या शहिदांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून पोस्टर स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेच्या परिक्षणाचे कार्य डॉ. आर. आर. गावीत, प्रा. राजीव आरके यांनी केले. पोस्टर स्पर्धेत स्वयंसेवकांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला.
शहिद दिनाचे औचित्य साधुन देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम तसेच देशभक्तीपर नृत्य असे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे ही आयोजन करण्यात आले.
37. 30.03.2022क श्रमदान व स्वच्छता मोहिम – 30 मार्च 2022ला श्रमदान व स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेत स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. तसेच ग्रंथालय स्वच्छता केली.
38. 09.04.2022 डॉ आंबेडकर जयंती – 09.042022 डॉ आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित समता सप्ताहाच्या निमित्ताने सामाजिक न्यायभवन, समाज कल्याण आणि विद्यावर्धिनी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याला रासेयो स्वयंसेवकांनी चांगला प्रतिसाद दिला व रक्तदान केले. कार्यक्रमाला प्राचार्य उपप्राचार्य व सहकारी प्राध्यापक, स्वयंसेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| **Dr. P. M. Lagade** | **Dr. M. P. Tardeja** | **Dr. S. S. Khatri** | **Dr. D. G. Vispute** |
| **Programme officer, NSS** | **Asst. Prog. officer, NSS** | **Asst. Prog. officer, NSS** | **Principal** |
| **Mob.No. 9923444840** | **Mob.No. 9423301306** | **Mob.No. 9420661068** | **Mob.No. 9423979145** |